MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : mcaer@rediffmail.com
दूरध्वनी (९५२०) २५५३ ७२५७.
वेबसाईट : www.mcaer.org
फॅक्स (९५२०) २५५३ ३७६४.


जा. क्र. मकृप/आस्था-४/विक्षेकानि-५४१३/ ९८८५ /२०१४,     दिनांक ८ ऑगस्ट, २०१४.

## थेट मुलाखती

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी विहित अटी व शतीवर मानधन तत्वावर खालीलप्रमाणे मनुष्यबळ ठेवावयाचे आहे.

मनुष्यबळाचा तपशील /संख्या व मासिक मानधनाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | मनुष्यबळ | एकुण आवश्यक संख्या | किमान आवश्यक योग्यता/अर्हता |
|---|---|---|---|
| १. | उप अभियंता (स्थापत्य शास्त्र) | १ | १. बी.ई (सिव्हील)<br>२.बांधकाम क्षेत्रातील किमान ७ वर्षांचा अनुभव.<br>३.शासकीय/निमशासकीय सेवेतून उप अभियंता(सिव्हील)/कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदावरुन सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य. |
| २. | कनिष्ठ अभियंता | २ | १. बी.ई (सिव्हील)/ डिप्लोमा (सिव्हील)<br>२.बांधकाम क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>३.शासकीय/निमशासकीय सेवेतून उप अभियंता (सिव्हील)/ कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदावरुन सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य. |
| ३. | सल्लागार वित्त | १ | १. सी.ए./आय.सी. डब्ल्यु. ए./एम.बी. ए. फायनास/ एम. एफ. एस/ जीडीसीए<br>२. वित्तीय प्रबंधक/वित्तीय कामकाजाचे १० वर्षांचा अनुभव<br>(शासकीय वित्तीय सेवेतून सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य.) |

सदर आवश्यक मनुष्यबळाची संख्या कमी /जास्त करण्याचा व त्याप्रमाणे निवड करण्याचा अधिकार महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी राखुन ठेवला आहे. निवड झालेल्या उमेदवारांना करारपद्धतीने मानधन तत्वावर ठेवण्यापूर्वी त्यांना त्यांच्या कामाच्या अटी व शर्ती उपलब्ध करुन देण्यात येतील, व त्यानुसार त्यांनी करारनामा केल्यानंतरच त्यांना कामावर ठेवण्यात येईल. कोणत्याही उमेदवाराला कोणत्याही दिवशी पूर्व सुचना/ कारण न देता कामावरुन कमी करण्याचा हक्क महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी राखुन ठेवलेले आहे.

पात्र इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरुन त्या अर्जासोबत सर्व दस्तऐवजांच्या प्रमाणित सत्य प्रती संलग्न करुन दि. ०७/०९/२०१४ पूर्वी महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७ या कार्यालयात पोहोचतील या बेताने पाठवावेत. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. कृषी परिषदेकडे प्राप्त अर्जांमधून मुलाखतीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना एसएमएस/ईमेल/फोनद्वारे कळविले जाईल. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी कृषी परिषेदकडून पात्र ठरवून सूचित करण्यात येईल. फक्त त्यांनीच दिनांक १६/०९/२०१४ रोजी सकाळी ठीक १०.०० वा. सर्व दस्तऐवजांच्या मूळ प्रती व दोन फोटांसह थेट मुलाखतीसाठी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७ येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. अपात्र उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही.

अर्जाचा नमुना उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्या जबाबदा-या, प्रवास व दैनिक भत्ता, करार नाम्यातील अटी व शर्ती इ. बाबतची सविस्तर माहिती कृषी परिषदेच्या संकेत स्थळावर (www.mcaer.org.in) वर उपलब्ध आहे.

महसंचालक,
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयुएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

**ई-मेल : mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (९५२०) २५५३ ७२५७.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स (९५२०) २५५३ ३७६४.**


जा. क्र. मकृप/आस्था-४/विक्षेकानि-५४१३/ १८९८ /२०१४, दिनांक ८ ऑगस्ट, २०१४.

## थेट मुलाखती

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी विहित अटी व शर्तीवर मानधन तत्वावर खालीलप्रमाणे मनुष्यबळ ठेवावयाचे आहे.

मनुष्यबळाचा तपशील /संख्या व मासिक मानधनाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | मनुष्यबळ | एकुण आवश्यक संख्या | किमान आवश्यक योग्यता/अर्हता |
|---|---|---|---|
| १. | उप अभियंता (स्थापत्य शास्त्र) | १ | १. बी.ई (सिव्हील)<br>२.बांधकाम क्षेत्रातील किमान ७ वर्षांचा अनुभव.<br>३.शासकीय/निमशासकीय सेवेतून उप अभियंता(सिव्हील)/कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदावरुन सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य. |
| २. | कनिष्ठ अभियंता | २ | १. बी.ई (सिव्हील)/ डिप्लोमा (सिव्हील)<br>२.बांधकाम क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>३.शासकीय/निमशासकीय सेवेतून उप अभियंता (सिव्हील)/ कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदावरुन सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य. |
| ३. | सल्लागार वित्त | १ | १. सी.ए./आय.सी. डब्ल्यु. ए./एम.बी. ए. फायनास/ एम. एफ. एस/ जीडीसीए<br>२. वित्तीय प्रबंधक/वित्तीय कामकाजाचे १० वर्षाचा अनुभव<br>(शासकीय वित्तीय सेवेतून सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य.) |

सदर आवश्यक मनुष्यबळाची संख्या कमी /जास्त करण्याचा व त्याप्रमाणे निवड करण्याचा अधिकार महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी राखुन ठेवला आहे. निवड झालेल्या उमेदवारांना करारपद्धतीने मानधन तत्वावर ठेवण्यापूर्वी त्यांना त्यांच्या कामाच्या अटी व शर्ती उपलब्ध करुन देण्यात येतील, व त्यानुसार त्यांनी करारनामा केल्यानंतरच त्यांना कामावर ठेवण्यात येईल. कोणत्याही उमेदवाराला कोणत्याही दिवशी पूर्व सुचना/ कारण न देता कामावरुन कमी करण्याचा हक्क महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी राखुन ठेवलेले आहे.

पात्र इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरुन त्या अर्जासोबत सर्व दस्तऐवजांच्या प्रमाणित सत्य प्रती संलग्न करुन दि. ०७/०९/२०१४ पूर्वी महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७ या कार्यालयात पोहोचतील या बेताने पाठवावेत. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. कृषी परिषदेकडे प्राप्त अर्जांमधून मुलाखतीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना एसएमएस/ईमेल/फोनद्वारे कळविले जाईल. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी कृषी परिषेदकडून पात्र ठरवून सूचित करण्यात येईल. फक्त त्यांनीच दिनांक १६/०९/२०१४ रोजी सकाळी ठीक १०.०० वा. सर्व दस्तऐवजांच्या मूळ प्रती व दोन फोटांसह थेट मुलाखतीसाठी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७ येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. अपात्र उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही.

अर्जाचा नमुना उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्या जबाबदा-या, प्रवास व दैनिक भत्ता, करार नाम्यातील अटी व शर्ती इ. बाबतची सविस्तर माहिती कृषी परिषदेच्या संकेत स्थळावर (www.mcaer.org.in ) वर उपलब्ध आहे.

महसंचालक,

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

**अर्जाचा नमुना**

फोटो

| | |
|---|---|
| पदाचे नाव | |
| उमेदवाराचे आडनाव | |
| उमेदवाराचे नाव | |
| उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | |
| पत्रव्यवहाराचा पत्ता (मोबाईल अथवा लँडलाईन नंबरसह व ई-मेल) | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जन्मदिनांक | | | | | | | | | वय | वर्षे | महिने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जातः | | पोटजात : | | वर्गवारी : | |

शैक्षणिक अर्हता (उच्चतम अर्हतेपासून सुरुवात करणे)

| अ.क्र. | पदव्युत्तर, पदवी, पदविका चे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

कामाचा अनुभव (सध्या कार्यरत असल्या त्या कार्यालयापासूनचा अनुभव व सध्या कार्यरत नसल्यास अगदी अलीकडील कालावधीतील कार्यालयापासून सुरुवात करावी)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | धारण केलेले पद | सेवा | |
|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

संगणक ज्ञान

| अ.क्र. | पदवी/पदविका यांचे नाव | विद्यापीठ संस्था | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | |
|---|---|---|
| अपेक्षित वेतन : रु. | | |

इतर :

(कृ.मा.प.)

टिप :

१. वरील अर्जात जागा अपुरी पडल्यास उमेदवाराने स्वतंत्र पानावर माहिती द्यावी.
२. सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.
३. सदरील पदे केवळ बाहययंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करून घेण्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात किंवा कृषी परिषद कार्यालयास आवश्यकता असेल त्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहे, याची मला पूर्ण कल्पना आहे.
४. सदरील पदासाठीची जाहिरात व अर्जातील सर्व मुद्दे, टिपा इ. मी व्यवस्थितरित्या वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी

ठिकाण :-

**कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यांच्या कालावधीसाठी ठेवण्यात येणा-या सल्लागार (वित्त)/ उपअभियंता/ कनिष्ठ अभियंता पदासाठीच्या करारनाम्यातील अटी व शर्ती**

१. उमेदवारांना ६ महिन्यांसाठी करार तत्त्वावर ठेवण्यात येणार आहे. तथापि त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

२. तथापि प्रथम ३ महिन्यांचा कालावधी हा परिविक्षाधिन कालावधी म्हणून समजला जाईल. या दरम्यान त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेऊन त्यांची सेवा समाधानकारक आढळून आली तरच त्यांना पुढील ३ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात येईल. तथापि पुन्हा स्पष्ट करण्यात येते की, या दरम्यान त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

३. या आदेशानुसार देण्यात येणा-या या एकत्रित मानधनामुळे त्यांना नियमित वा शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

४. उमेदवारास पुर्णतः करारपध्दती व मानधन तत्वावर कामावर ठेवण्यात येणार आहे. तरी या कारणामुळे भविष्यात या संस्थेतील किंवा शासनाचे कोणत्याही इतर विभागातील कोणत्याही पदावर त्यांचा कसल्याही प्रकारचा हक्क असणार नाही.

५. उमेदवारांना कराराच्या काळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास १५ दिवसाची लेखी पुर्वसुचना देणे त्यांचेवर बंधनकारक असेल, अथवा त्यांना १५ दिवसाचे मानधन कार्यालयाकडे जमा करावे लागेल.

६. काम करीत असताना उमेदवारांच्या हातुन / कडून शासकीय मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जे नुकसान होईल त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवारांवर राहील. व सदर नुकसानी बाबतची भरपाई करुन घेण्यात येईल.

७. उमेदवारांना एकत्रित मानधन प्रासंगिक कामासाठी करारतत्त्वावर देण्यात येईल व त्यासाठीचे दर हे महासंचालक ठरवतील व त्याप्रमाणे देय राहतील. त्यामधुन नियमाप्रमाणे सेवाकर कपात करण्यात येईल.

८. उमेदवार, पुर्णतः करारपध्दतीने मानधन तत्वावर काम करणार असल्यामुळे या एकत्रित मानधनाशिवाय अन्य कोणतेही वेतन व भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

९. वरील करारनाम्यामधील नमुद सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांना महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर करारनामा केल्यानंतर उमेदवारांना संबधीत पदावर हजर करण्यात येईल.

१०. उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील पदाची कर्तव्य व जबाबदा-या हया लागू राहतील.

## प्रवास व दैनिक भत्ता

अंतिम निवड झालेल्या व सेवेत रुजु झालेल्या उमेदवारांना करारांतर्गत जबाबदा-या पुर्ण करण्यास्तव त्यांना प्रवास करण्याची आवश्यकता भासल्यास सक्षम अधिका-यांच्या परवानगीने त्यांना तो करता येईल व त्यासाठीचे खर्चाच्या पुर्ततेसाठी शासन नियमा आधारभूत मानण्यात येतील.

**उप अभियंता/कनिष्ठ अभियंत्याचे अधिकार व कर्तव्ये-**

उप अभियंता/कनिष्ठ अभियंता हा थेट महासंचालकांच्या अधिन राहून काम करील आणि पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील, ती अशी-

(१) कृषी परिषद कार्यालयाची इमारत, रस्ते, कुंपण आणि परिसर यांचे परिरक्षण करणे.

(२) मलनिःसारण, विद्युत, पाणीपुरवठा व दूरध्वनी यासारख्या सर्व सार्वजनिक सेवा बांधणे व त्यांचे परिरक्षण करणे.

(३) आग प्रतिबंधक सेवा उभारणे व त्यांचे परिरक्षण करणे.

(४) कृषी परिषद कार्यालयाचे संकल्पीत योजना आणि अंदाज तयार करणे.

(५) त्यांच्यावर सोपवलेल्या कामासंबंधातील लेखा ठेवील,

(६) कृषी परिषद कार्यालयाच्या जागेची, स्वच्छता आणि सफाई वेळोवेळी करुन घेणे

(७) कृषी विद्यापीठांकडून कृषी परिषद कार्यालयास प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त बांधकाम प्रस्तावांची छाननी /तपासणी करणे, कामाचे अंदाजपत्रकांची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करणे.

(८) कृषी विद्यापीठांमध्ये झालेल्या व चालू असलेल्या बांधकाम विषयी तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी/ तांत्रिक आणि आर्थिकदृष्टया तपासणीसाठी शासन स्तरावरुन प्राप्त झालेल्या निर्देशानुसार तपासणी करणे.

**सल्लागार (वित्त)**

राज्यातील कृषि विद्यापीठांची वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प लेखा व लेखापरीक्षा यांच्याशी संबंधीत बाबींमध्ये तो सदस्य-सचिवाला प्रत्यक्षपणे जबाबदार असेल. तो खालील कर्तव्ये पार पाडेल :-

एक) परिषदेच्या निधींच्या योग्य उपयोजनाकरिता आणि वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखा व लेखापरीक्षा यांच्याशी संबंधीत बाबींमध्ये परिषदेला व कृषि विद्यापीठांना सल्ला देण्याकरिता तो जबाबदार असेल.

दोन) राज्यातील कृषी विद्यापीठांच्या सर्व योजना प्रस्तावांची, परिषदेच्या त्या-त्या विभागांची त्या योजना प्रस्तावांना तात्रिक दृष्टया मंजुरी मिळाल्यानंतर परंतु सदस्य-सचिवाकडे सादर करण्यापुर्वी वित्तीयदृष्टया छाननी करण्यासाठी तो जबाबदार असेल.

तीन) त्याच्या निदर्शनास आलेल्या वित्तीय अनियमितता, परिषदेच्या व राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्याकरिता तो जबाबदार असेल.

चार) कृषि विद्यापीठांच्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या व सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या छाननीकरिता आणि या बाबतीत परिषदेला व शासनाला सल्ला देण्यासाठी तो जबाबदार असेल.

पाच) परिषदेच्या व कृषि विद्यापीठांच्या अर्थसंकल्पीय प्रस्तावांच्या पुनर्विनियोजनाकरिता असलेल्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता व याबाबतीत परिषदेला सल्ला देण्याकरिता तो जबाबदार असेल.

सहा) योजनांतर्गत व योजनेतर अनुदान देण्याकरिता कृषि विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता व याबाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी तो जबाबदार असेल.

सात) सर्व वित्तीय बाबींच्या संबंधात तसेच वार्षिक लेखे पूर्ण करण्याकरिता व लेखा परिक्षणाच्या अनुपालनाकरिता कृषि विद्यापीठांच्या नियंत्रकाला, सूचना देण्यासाठी व मार्गदर्शन करण्याकरिता तो जबाबदार असेल.

आठ) वित्त व्यवस्था, अथसंकल्प, लेखे व लेखापरिक्षण याच्याशी संबंधित बाबींच्या बाबतीत कृषी विद्यापीठे अधिनियमाच्या तरतदुी, संविधी, राज्य शासन तसेच परिषदेचे नियम व निदेश यांचे पालन करतात का यावर लक्ष ठेवेल.

नऊ) सदस्य-सचिव त्याच्याकडे विशेषरीत्या नेमून देईल अशी इतर विशेष कर्तव्ये व कार्ये तो पार पाडेल.